सभासदांनी कृपया ध्यानांत ठेवावे की, सर्क्युलर्सच्या अनुपालनांत, एका सामाईक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय एजीएम आयोजित केली जाईल आणि सभासद फक्त व्हीसी सुविधेमार्फत एजीएमला हजर राहू शकतात. व्हीसी सुविधेमार्फत एजीएममध्ये सहभागी होण्यासाठीचे तपशिलवार निर्देश एजीएमच्या सूचनेत दिले आहेत आणि व्हीसी मार्फत एजीएमला हजर राहणाऱ्या सभासदांना अधिनियमाच्या कलम १०३ अन्वये गणसंख्या पूर्ततेसाठी हिशोबात धरले जाईल.

एजीएमच्या सूचनेसह आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी कंपनीच्या एकात्मिक वार्षिक अहवाल (''एकात्मिक वार्षिक अहवाल'') हा ज्यांचे ई-मेल आयडीज कंपनी/रजिस्ट्रार ॲंड शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच बिगशेअर सर्व्हीसेस प्रायव्हेट लिमिटेड (''आरटीए'')/सभासदांचे संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटस (''डीपी'') कडे नोंदवले असतील त्या सर्व सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवली आहे. जेथे एजीएमची सूचनेसह एकात्मिक वार्षिक अहवाल उपलब्ध आहे अशा वेबलिंकला निर्देश देणारी निश्चित वेबलिंक आणि क्युआर कोड हा ज्या सभासदांचे ईमेल आयडी कंपनी/आरटीए/डीपींकडे नोंदविलेले नाहीत त्यांना वेगळी पाठविण्यात येईल. एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवलाची इलेक्ट्रॉनिक पाठवणी सोमवार, १८ ऑगस्ट, २०२५ रोजी पूर्ण केली आहे.

एजीएमची सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट www.eplglobal.com/investors/, वर कंपनीचे समभाग ज्यावर सूचिबध्द आहेत त्या स्टॉक एक्सचेंजेसच्या संबंधित वेबसाईटस म्हणजेच बीएसई लिमिटेड (''बीएसई'') ची www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (''एनएसई'') ची www.nseindia.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (''एनएसडीएल'') ची वेबसाईट https://evoting.nsdl.com वर सुध्दा उपलब्ध आहेत. जे सभासद सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत मिळवण्यास इच्छुक आहेत त्यांनी ह्या बाबतीत एक लेखी विनंती कंपनीला legal-secretarial@eplglobal.com येथे करावी.

कंपनीने कंपनीच्या सभासदांना ई-व्होटींग सुविधा आणि व्हीसी मार्फत एजीएमला हजर राहण्यासाठी एनएसडीएल ची सेवा घेतली आहे.

रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये ई-व्होटींग:

सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की, अधिनियमाच्या कलम १०८ च्या तरतुदी सहवाचता कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ (सुधारित) चा नियम २०, सर्वसाधारण सभांवरील सुधारित सेक्रेटरीयल स्टॅंडर्ड-२, सेबी लिस्टींग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४४ आणि सर्क्युलर्सच्या बाबतीत कंपनी एजीएममध्ये करावयाच्या कामकाजाच्या संबंधात तिच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाची सुविधा (''रिमोट ई-व्होटींग'') आणि एजीएममध्ये ई-व्होटींग पुरवत आहे. वर सांगितल्या प्रमाणे, रिमोट ई-व्होटींग वापरून तसेच एजीएममध्ये ई-व्होटींगने मते देण्यासाठीची सुविधा एनएसडीएल कडून पुरवली जाईल. ई-व्होटींग साठीचे तपशिलवार निर्देश एजीएमच्या सूचनेत तसेच एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालासह एनएसडीएलने सभासदांना पाठवलेल्या ई-मेल मध्ये दिले आहेत. मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ (''कट-ऑफ डेट'') रोजीस ज्यांची नावे सभासदांच्या नोंदवहीत/लाभार्थी मालकांच्या सूचीत असतील व एकतर प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सभासद एजीएमच्या सूचनेत मांडलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देण्यास हक्कदार असतील.

रिमोट ई-व्होटींगचा कालावधी **शनिवार, ६ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि सोमवार, ८ सप्टेंबर, २०२५ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल.** त्यानंतर मतदानासाठी रिमोट ई-व्होटींग मॉड्युल एनएसडीएलकडून निष्क्रिय केले जाईल. सभासदाने एकदा का ठरावावर मत दिले की, त्यानंतर त्यात बदल करण्याची अनुमती नसेल. ई-व्होटींग सुविधा एजीएममध्ये सुध्दा पुरवली जाईल आणि फक्त ज्यांनी रिमोट ई-व्होटींग मार्फत त्यांची मते दिली नसतील व जे एजीएमला हजर असतील अशाच सभासदांना एजीएममध्ये ई-व्होटींग मार्फत त्यांचे मत देणे शक्य होईल. सभासद रिमोट ई-व्होटींग मार्फत मत देण्याचे त्यांचे अधिकार वापरल्यानंतरही एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात परंतु एजीएममध्ये पुन्हा मत देण्याची अनुमती त्यांना दिली जाणार नाही. सभासदांचे मतदान अधिकार कट-ऑफ डेट रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात असतील.

पुढे, कंपनीने रिमोट ई-व्होटींग आणि एजीएममध्ये ई-व्होटींगची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून मे. एम. एस पित्रोडा ॲंड कं., व्यावसायीक कंपनी सेक्रेटरीजचे श्री. मेहुल पित्रोटा यांची नियुक्ती केली आहे.

कोणत्याही बिगर वैयक्तिक व्यक्ती ज्या प्रत्यक्ष स्वरूपात रोखे धारण करत असतील, ज्यांनी सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित करून कट-ऑफ डेट पूर्वी कंपनीची सभासद बनली त्या त्यांच्या फोलिओ क्र./डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून evoting@nsdl.com वर किंवा कंपनीला legal-secretarial@eplglobal.com वर किंवा तिच्या आरटीएला investor@bigshareonline.com, येथे एक विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. तथापि, जर सभासद, रिमोट ई-व्होटींग साठी आधीच एनएसडीएलकडे नोंदणीकृत असेल तर मते देण्यासाठी ते त्यांचा सध्याचा युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात. जे सभासद युजर आयडी आणि पासवर्ड विसरले असतील ते www.evoting@nsdl.com वर उपलब्ध ''फरगॉट युजर डिटेल्स/पासवर्ड'' किंवा ''फिजीक युजर रिसेट पासवर्ड'' वापरून त्यांचा पासवर्ड रिसेट करू शकतात किंवा टोल फ्री क्र. ०२२-४८८६७००० वर कॉल करू शकतात. डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात रोखे धारण करणारे वैयक्तिक सभासद ज्यांनी सूचना पाठवल्यानंतर परंतू कट-ऑफ डेट पूर्वी कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीचे सभासद झाले ते ''ॲक्सेस टु एनएसडीएल ई-व्होटींग सिस्टीम'' पर्यायामध्ये एजीएमच्या सूचनेत दिलेली लॉगीन प्रक्रिया अनुसरू शकतात.

जे सभासद प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करतात आणि/किंवा ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडीज कंपनी/आरटीए/डीपीकडे नोंदवले नाहीत त्यांना मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी एजीएमच्या सूचनेतील प्रक्रिया अनुसरून रिमोट ई-व्होटींग मार्फत तसेच एजीएममध्ये ई-व्होटींग मार्फत एजीएमच्या सूचनेत मांडलेल्या कामकाजावर दुरस्थपणे त्यांची मते देण्याची संधी मिळेल. प्रक्रियेचा सारांश खालीलप्रमाणे:

(i) प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे असे सभासदांनी ई-व्होटींग साठी युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी legal-secretarial@eplglobal.com आणि/किंवा evoting@nsdl.com येथे ई-मेलने फोलिओ क्रमांक, नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढची व मागची), पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत, आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत पुरवावा;

(ii) डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या अशा सभासदांनी ई-व्होटींग साठी युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी legal-secretarial@eplglobal.com आणि/किंवा evoting@nsdl.com येथे ई-मेलने डीपी आयडी आणि क्लायंट आयडी (१६ अंकी डीपी आयडी + क्लायंट आयडी किंवा १६ अंकी बेनेफिशीयरी आयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित लेखा विवरणाची प्रत, पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत, आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत पाठवावी; आणि

(iii) डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या वैयक्तिक सभासदांनी कृपया ई-व्होटींग आणि आभासी सभेत सामिल होण्यासाठी एजीएमच्या सूचनेत कळवलेली लॉगीन पध्दत बघावी.

यास पर्याय म्हणून, सभासद वरील दस्तावेज पुरवून ई-व्होटींगसाठी युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी evoting@nsdl.com वर एक विनंती पाठवू शकतात.

रिमोट ई-व्होटींग मार्फत आणि एजीएममध्ये ई-व्होटींग मार्फत इलेक्ट्रॉनिक मतदानाची पध्दत आणि व्हीसी मार्फत एजीएममध्ये सामिल होण्याची पध्दत एजीएमच्या सूचनेत तपशिलवार दिलेली आहे. कोणतीही शंका असल्यास, सभासदांनी www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन येथे उपलब्ध सभासदांसाठी फिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्युज) आणि सभासदांसाठी ई-व्होटींग युजर मॅन्युअल पाहू शकतात किंवा ०२२ ४८८६ ७००० वर कॉल करू शकतात किंवा evoting@nsdl.com येथे किंवा complianceofficer@eplglobal.com. येथे एक विनंती पाठवावी.

ई-मेल ॲड्रेसेस नोंदवण्याची आणि अद्ययावत करण्याची पध्दत:

प्रत्यक्ष स्वरूपात ज्यांनी शेअर्स धारण केले आणि ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडीज कंपनीकडे अद्ययावत केले नाहीत अशा सभासदांनी कृपया ते कंपनीला legal-secretarial@eplglobal.com येथे तिचे आरटीएला investor@bigshareonline.com, येथे त्या संबंधातील आवश्यक अशा दस्तावेजांसह रितसर भरून स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ (जो कंपनीची वेबसाईट म्हणजेच https://www.eplglobal.com/investors/shareholder-information/) येथे उपलब्ध आहे) सादर करून अद्ययावत करावेत. डिमटेरिअलाईज्ड (डिमॅट) स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांनी कृपया त्यांच्या संबंधित डीपीकडे त्यांचे ईमेल आयडीज नोंदवावेत/अद्ययावत करावेत. ई-मेल आयडीज नोंदवण्यात कोणत्याही समस्या/शंक असल्यास सभासद कंपनीला legal-secretarial@eplglobal.com येथे तिच्या आरटीएला investor@bigshareonline.com, येथे लिहू शकतात.

लाभांश आणि रेकॉर्ड डेट:

सभासदांनी कृपया ध्यानांत ठेवावे की, कंपनीच्या संचालक मंडळाने ८ मे, २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी प्रत्येकी रु. २/- दर्शनी मूल्याच्या भागावर रु. २.५० च्या अंतिम लाभांशाची (''अंतिम लाभांश'') शिफारस केली आहे. कंपनीने अंतिम लाभांश प्राप्त करण्यासाठी सभासदांची हक्कदारी ठरवण्यासाठी रेकॉर्ड डेट म्हणून **मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५** ही तारीख नक्की केली आहे आणि कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तके बुधवार, ३ सप्टेंबर, २०२५ ते मंगळवार, ९ सप्टेंबर २०२५ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील. एजीएममध्ये सभासदांनी अंतिम लाभांशास मंजुरी दिल्यास तो सभासदना बुधवार, ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाने दिलेल्या आदेशानुसार व सेबीने विहित केल्यानुसार प्रदानाच्या अनुज्ञेय माध्यमातून आणि टॅक्स ॲट सोर्स च्या कपातीच्या अधीन प्रदान केला जाईल.

पुढे, सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, १ एप्रिल, २०२० पासून फायनान्स ॲक्ट, २०२० च्या अनुषंगाने आयकर अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणांच्या बाबतीत लाभांश उत्पन्न सभासदांच्या हाती येताच करपात्र असते आणि कंपनीने विहित दरांनी सभासदांना प्रदान केल्या जाणाऱ्या लाभांशामधून उद्गम कर कपात (टीडीएस) करणे आवश्यक असते. त्यानुसार, कोणत्याही प्रयोज्य लाभप्रद दरांसाठी दावा करण्याकरिता डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सभासदनी कृपया त्यांची निवासी स्थिती, पॅन आणि आयकर अधिनियम, १९६१ नुसार त्यांचा प्रवर्ग त्यांच्या संबंधित डीपीजकडे अद्ययावत करावे कृपया असे तपशील शुक्रवार, २९ ऑगस्ट, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी कंपनीला epl.dividendtds@eplglobal.com येथे किंवा आरटीएला tds@bigshareonline.com, येथे आवश्यक दस्तावेज, घोषणापत्र पाठवून अद्ययावत करावेत. आवश्यक घोषणापत्रांचे नमुने आणि तपशिलवार प्रक्रिया कंपनीची वेबसाईट www.eplglobal.com/shareholder-information/. येथे उपलब्ध आहे. सभासदांनी कृपया त्यांच्या सर्व पत्रव्यवहारात त्यांचा फोलीओ/ डिमॅट अकाऊंट नंबर, संपर्क तपशील इ. सुध्दा नमूद करावा.

ईपीएल लिमिटेडसाठी
सही/-
ओंकार घांगुर्डे
हेड-लिगल, कंपनी सेक्रेटरी
ॲंड कॉंप्लायन्स ऑफिसर
आयसीएसआय सभासदत्व क्र.: ए३०६३६

दिनांक: १८ ऑगस्ट, २०२५
ठिकाण: मुंबई

डॉईश बॅंक एजी

जाहीर सूचना - मिळकतीची लिलाव नि विक्री

सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२, अन्वये स्थावर मिळकतीची विक्री

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे डॉईश बॅंक एजी, त्याच्या व्यवसायाचे एक ठिकाण येथे निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २ रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३ **(डॉईश बॅंक एजी)** चे प्राधिकृत अधिकारी **(''डॉईश बॅंक एजी'')** यांनी सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस ॲंड एन्फार्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ **(''ॲक्ट'')** च्या कलम १३ (२) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (रुल्स) च्या नियम ९ अन्वये मागणी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत त्यावरील व्याज आणि **३०/०७/२०२३** रोजीस **रु.१,१६,५६,८७९/- (रुपये एक करोड सोळा लाख छपन्ना हजार आठशे एकोणऐंशी मात्र)** ची थकबाकी रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार/सह-कर्जदार **दत्तात्रय सुरेश चव्हाण, योगिता दत्तात्रय चव्हाण आणि योग्स लॉजिस्टिक्स** रहिवासीत येथे फ्लॅट क्र. १००६, १० वा मजला, स्टेलर महावीर युनिव्हर्स, महावीर युनिव्हर्स सोसायटी **रोड,** आय बी एस मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०००७८ यांना बोलाविण्यासाठी **२ ऑगस्ट २०२३** दिनांकीत मागणी सूचना जारी केली होती.

थकबाकी रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरले. कर्जदार आणि सामान्य नागरिकांना कळविण्यात येते की, सदर ॲक्टच्या नियम ८ सहवाचता ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून सदर थकबाकी रकमेची वसुली करण्याकरिता खालील उल्लेखित बॅंकेसह गहाण मिळकतीचा कब्जा घेतला.

आता सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, मिळकत खाली वर्णन केलेल्या अटी व शर्ती आणि प्रक्रियेनुसार मोहोरबंद पाकिटातून बोली मागवून **११ सप्टेंबर, २०२५ रोजी दु.४ वा.** डॉईश बॅंक एजी, निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २ रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई ४०००६३ येथे ''जे आहे जेथे आहे'' तत्त्वाने आणि ''जे आहे जसे आहे'' तत्त्वाने विकण्यात येईल.

अ. क्र.	तारण मिळकतीचा पत्ता	राखीव किंमत	इअर	लिलाव दिनांक
१.	फ्लॅट क्र. १००६, १० वा मजला, स्टेलर महावीर युनिव्हर्स सोसायटी रोड, एल बी एस मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०००७८. मोजमापित ५७.२५ चौ.मीटर्स (चटई क्षेत्र)	रु. १,३५,००,०००/-	रु. १३,५०,०००/-	**११ सप्टेंबर २०२५**

मिळकतीच्या संबंधातील तपशील बॅंकेच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे वर्णन केले आहेत, तथापि सदर तपशिलांमधील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी ती जबाबदार नसेल. म्हणून निविदाकार/प्रस्तावकर्ते/संभाव्य बोलीदार/खरेदीदार यांनी त्यांच्या स्वत:च्या हितासाठी निविदा सादर करण्यापूर्वी मिळकतीच्या संबंधातील त्यांची स्वत:ची खात्री करून घ्यावी. बॅंकेच्या सर्वोत्तम समजुतीप्रमाणे मिळकतीवर कोणतेही भार नाहीत आणि योग्य कायदेशीर प्रक्रिया वापरून मिळकतीची विक्री करण्याचा अधिकार बॅंकेला आहे.

जाहिर लिलावाच्या अटी आणि शर्ती :

१. मिळकतीचे निरीक्षण **२३ ऑगस्ट, २०२५** रोजी **स. ११.०० ते सायं ५.००** दरम्यान करता येईल. **११ सप्टेंबर, २०२५** रोजी किंवा पूर्वी **दु. २.००** पर्यंत डॉईश बॅंक एजी, येथे निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३ डॉईश बॅंक एजी च्या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने ''मे. डॉईश बॅंक एजी'' च्या नावातीत **रु. १३,५०,०००/- (रुपये तेरा लाख पन्नास हजार मात्र)** ही इसारा अनामत रकमेसाठीच्या डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर सहित निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयात एका मोहोरबंद पाकिटातून बोली सादर कराव्यात. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज नसेल.

२. जो प्रस्ताव रितसर भरला जात नाही किंवा इअर सोबत नसलेला प्रस्ताव किंवा येथे नमूद तारिख आणि वेळ नंतर प्राप्त झालेला प्रस्ताव वैध प्रस्ताव मानला जाणार नाही आणि त्यानुसार रद्द केल्या जातील. इअर वर कोणतेही व्याज देय असणार नाही.

३. बोली प्रपत्रासहित प्रस्तावित बोलीदारांनी (पासपोर्ट, इलेक्शन कमिशन कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायन्सस इ.) सारखे त्याच्या/तिच्या ओळखीचे पुरावे, वास्तव्याचे पुरावे आणि आयकर विभागाने जारी केलेल्या पॅन कार्डची प्रत जोडावी.

४. विक्रीच्या तारखेस, रितसर प्राप्त झालेल्या सर्व बोली उघडल्या जातील आणि राखीव किंमतीच्यावर असल्यास, सर्वोच्च बोलीदारांची बोली बॅंकेकडून स्वीकारली जाईल. तथापि, लिलावाच्या ठिकाणी व्यक्तिश: हजर असलेल्या बोलीदारांना सर्वोच्च बोलीदारांनी देऊ केलेल्या किंमतीपेक्षा किमान **रु. २५,०००/- (रूपये पंचवीस हजार मात्र)** जास्त रक्कम देऊ केल्यास त्यांची बोली किंमत पुढे वाढविण्याचा अधिकार असेल आणि अशा त्याहून जास्तीची बोली स्वीकारण्याचा अधिकार बॅंकेला असेल. बॅंकेने विक्री संमत केल्यानंतर, खरेदीदारांना विक्री किंमतीच्या **२५% (पंचवीस टक्के)** निम्नस्वाक्षरीकारांकडे तात्काळ इसारा अनामत रक्कम समायोजित करून भरावी लागेल.

५. त्यांना योग्य आणि वाजवी वाटतील अशा अटी व शर्तीच्या अधीन त्यांच्या स्वेच्छेने बॅंक मुदतवाढीच्या विनंतीस मान्यता देऊ शकते. खरेदीची उर्वरित किंमत रक्कम खरेदीदारांनी मिळकतीच्या विक्रीच्या मंजुरी नंतर पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा पक्षकारांनी लेखी स्वरूपांत कबूल केलेल्या वाढीव मुदतीत बॅंकेला प्रदान करायची आहे. निर्धारित कालावधीत संपूर्ण मोबदला रकमेचे प्रदान करण्यांत कसूर केल्यास बॅंक इ.अ.र आणि/किंवा खरेदीदारांनी केलेले अन्य कोणतेही प्रदान जप्त करण्यास आणि मिळकतीचा पुनर्लिलाव करण्यास मुक्त असेल. कसूरवार खरेदीदारांना मिळकतीवरील किंवा त्यानंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यापैकी कोणत्याही हिश्श्यावरील अधिकार उरणार नाहीत.

६. खरेदीदारांनी सर्व प्रदान ''डॉईश बॅंक एजी''च्या नावातील डिमांड ड्राफ्ट/पे ऑडरच्या माध्यमातून केले पाहिजे.

७. संपूर्ण विक्री किंमत मिळाल्यावर, बॅंक खरेदीदार/त्यांचे नामनिर्देशिती यांच्या नावे एक विक्री प्रमाणपत्र जारी करेल आणि खरेदीदारांना मिळकतीचा कब्जा सुपूर्द करेल.

८. वरील परिशिष्टात वर्णन सदर स्थावर मिळकत निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी द्वारे विक्रीची निश्चिती झाल्याच्या तारखेपासून आग किंवा चोरी किंवा अन्य अपघात यामुळे नुकसान किंवा हानी यासारख्या मिळकतीशी संबंधित सर्व जोखिमींच्या सर्व बाबतीत मिळकत खरेदीदारांकडे निहित असेल आणि राहील. कोणत्याही कारणाने खरेदीदारांना विक्री रद्द करता येणार नाही.

९. इअर प्रती जमा केलेले डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील.

१०. सर्व हेतू करीता सदर मिळकत विक्री जे आहे जेथे आहे तत्वावर करण्यात येईल. बॅंकेच्या प्राधिकृत अधिकारीच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती नुसार सदर मिळकतीवर कोणताही इतर भार नाही.

११. सदर स्थावर मिळकतीच्या संबंधातील मुद्रांक शुल्क, नोंदणी आकार, हस्तांतरण आकार आणि अन्य कोणतेही आकार यासाठीचा सर्व खर्च खरेदीदारांनी करावयाचा आहे. मिळकतीच्या संबंधातील पालिका कर, मेन्टेनन्स/सोसायटी चार्जेस, वीज आणि पाणी कर, उपकर किंवा अन्य कोणतीही थकबाकी यासारखी सर्व देणी यशस्वी खरेदीदारांनी प्रदान करावी लागतील.

१२. कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव किंवा सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बॅंक बांधील नसेल आणि कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचा तिचा अधिकार बॅंक राखून ठेवत आहे.

१३. बोलीदारांना स्वत: किंवा त्यांचे रितसर प्राधिकृत प्रतिनिधी यांच्याशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीला विक्री प्रक्रियेत सहभागी होण्याची अनुमती दिली जाणार नाही.

१४. जर बॅंकेने केलेला सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्चासह एकत्रित संपूर्ण थकबाकी हि ॲक्टच्या कलम १३(८) अन्वये मिळकतीच्या विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी वरील नावाच्या कर्जदारांनी भरणा केली तर मिळकत विकली जाणार नाही आणि संभाव्य बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व बोली बॅंकेविरूद्ध कोणत्याही दायित्व/दाव्या शिवाय त्यांना परत केल्या जातील.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स,२००२च्या नियम ८(६) अन्वये वरील उल्लेखित कर्जदारांना ही एक सूचना देखील आहे.

डायना नाडार, प्राधिकृत अधिकारी -डॉईश बॅंक एजी
ईमेल : diana.nadar@db.com
संपर्क क्रमांक: ९८२००६६६१३, ९६१९८८७७०७, ९१५२७७०६०७, ९८२१६०००२९, ०२२ ७१८० ३१६७/३७२७/३०७७/३४७९.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १९ ऑगस्ट, २०२५

नि. क्र. ३५

रजि. ए.डी/दस्ती/चिटकविणे/ढोल वाजवणे आणि प्रकाशन/डीआरटी चा सूचना फलक

विक्रीची उद्घोषणा

वसुली अधिकारी-I यांचे कार्यालय,मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-I,

एमटीएनएल भवन, २रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५.

आर. पी. क्र.: ११ सन २०२२ **दिनांक : १०/०९/२०२५**

रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यु टू बॅंक अॅण्ड फायनान्शिअल इन्स्टिट्युशन्स ॲक्ट, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ३८, ५२(२) अन्वये विक्रीची उद्घोषणा

युनियन बॅंक ऑफ इंडिया ..... **अर्जदार/प्रमाणपत्र धारक**

विरुध्द

रोहित दिनेश उत्तेकर आणि अन्य ....**प्रतिवादी/प्रमाणपत्र कर्जदार**

१. रोहत दिनेश उत्तेकर, राहणार ए/६०१, सागर दृष्टी बिल्डिंग, जुना पेट्रोल पंपजवळ, मिरा भाईंदर रोड, ठाणे- ४०११०७, आणि येथे सुध्दा: फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, वैष्णव हाईटस्, माजिवडे, ठाणे (पश्चिम)- ४००६०१.

२. विवेक एस. माने, राहणार, सी/२०४, आंगण अपार्टमेंट, तुलिंज रोड, नालासोपारा (पू.).

ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. I, मुंबई यांनी व्याज आणि खर्चासह **रू. ३२,६३,१६८/- (रुपये बत्तीस लाख त्रेसष्ट हजार एकशे अडुसष्ट मात्र)** च्या वसुलीसाठी हस्तांतर मूळ अर्ज क्र. **७८८ सन २०१६** मध्ये वसुली प्रमाणपत्र काढले, जी वसुली प्रमाणपत्र/हुकुमाप्रमाणे पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभारासह एकत्रित वसुलीयोग्य आहे.

आणि ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी सदर प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विकण्याचे आदेश दिले.

आणि ज्याअर्थी त्यावरील व्याज आणि खर्चासह **रु.६५,२५,६९४/- (रुपये पासष्ट लाख पंचवीस हजार सहाशे चौऱ्याण्णव मात्र)** ही रक्कम **३१.०७.२०२५** पर्यंत त्यावरील खर्च आणि व्याजासह प्रमाणपत्र धारकांना थकित आहे.

१. याद्वारे सूचना देण्यात येते की, जर पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश नसल्यास, सदर मिळकत **२५.०९.२०२५ रोजी दु. ०२.०० ते दु. ०३.००** दरम्यान (आवश्यक असल्यास बंद होण्यापूर्वी शेवटच्या ५ मिनिटात बोली केल्यास आपोआप विस्तार खंडासह) ई-लिलावाने विकली जाईल आणि बोली मे. ई-प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजिस लि. ची वेबसाईट https://drt.auctiontiger.net मार्फत ''ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बोली'' मार्फत करण्यात येईल. संपर्क व्यक्ती **श्री. प्रवीण थेवर,** मोबाईल क्र. **९७२२७७८८२८, ई-मेल : praveen.thevar@auctiontiger.net आणि support@auctiontiger.net. पुढील तपशिलाकरिता संपर्क श्री. राजेश कुमार, (मुख्य व्यवस्थापक) (मोबाईल क्र. ८०८८९८०८११), ईमेल आयडी:-ubin0553352@unionbankofindia.bank.**

२. खालील परिशिष्टात वर्णन केल्याप्रमाणे उपरिनामित प्रतिवादींच्या मिळकतीची विक्री आणि सदर मिळकतीशी निगडित दायित्वे आणि दावे, जो पर्यंत ते सुनिश्चित केले आहेत, ते प्रत्येक संचासमोर परिशिष्टात विनिर्दिष्ट केले आहेत.

३. परिशिष्टांत विनिर्दिष्ट केलेल्या संचांमधील विक्रीसाठी मिळकत ठेवली जाईल. जर, मिळकतीच्या एखाद्या हिश्श्याच्या विक्रीतून रोकड झालेल्या रकमेतून देणे भागले तर, उर्वरित बाबतीत विक्री ताबडतोब थांबवली जाईल. जर, विक्री घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सदर प्रमाणपत्रातील थकबाकी, व्याज, खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणत्याही संचाच्या विक्रीआधी जमा केली किंवा त्यांना पटेल असे प्रमाणपत्रातील रक्कम, व्याज व खर्च निम्नस्वाक्षरीकारांकडे प्रदान केल्याचे पुरावे सादर केले तर ती विक्री देखील थांबविण्यात येईल.

४. विक्रीशी संबंधित कोणतीही कृती करणारे कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे विकावयाच्या मिळकतीसाठी बोली, संपादन किंवा कोणतेही हितसंबंध संपादित करू शकणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टात विहित अटी आणि त्याअंतर्गतचे नियम आणि खालील शर्तींच्या अधीन होईल.

५. जोडलेल्या परिशिष्टांतील विनिर्दिष्ट तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहितीप्रमाणे दिले आहेत, परंतु ह्या उद्घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, गैर-विधाने किंवा उणिवांसाठी निम्नस्वाक्षरीकार उत्तर देण्यास बांधील नसतील.

६. सदर मत्तांचा पुढील तपशिलानुसार लिलाव करण्यात येईल :

संच क्र.	विकण्यात येणाऱ्या मिळकतीचे वर्णन	निरिक्षणाची तारीख	राखीव किंमत (रक्कम रुपयात)	इअर (रक्कम रुपयात)	(रुपयात बोली वाढविणे)
१	फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, वैष्णव हाईटस् (नोंदणी क्र. बीओएम/ डब्ल्यूकेडब्ल्यू/एचएसजी (टीजी)/१३३६२), सर्व्हे क्र. १, हिस्सा क्र. ३, गाव माजिवडा, गणपती कारखान्याजवळ, जय भवानी नगर रोड, ठाणे-४००६०१.	१६.०९.२०२५	रु. ३२,३२,०००/-	रु. ३,२३,२००/-	रु. १,००,०००/-

राखीव किंमत ज्याखाली मिळकत विकली जाणार नाही ती **रु. ३२,३२,०००/- (रुपये बत्तीस लाख बत्तीस हजार मात्र).**

७. ज्या रकमेने बोली वाढवायची ती रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र). बोलीच्या रकमेवरुन किंवा बोलीदारांवरुन कोणताही वाद झाला तर संच पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल.

८. सर्वोच्च बोलीदारांना कोणत्याही संचाचे खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. हे सर्वस्वी निम्नस्वाक्षरीकारांच्या मर्जीवर अवलंबून असेल की, जेव्हा सरळ सरळ दिसते आहे की, देऊ केलेली किंमत अपुरी आहे तेव्हा ती करणे अव्यवहार्य आहे अशा वेळी सर्वोच्च बोली नाकारायची/स्वीकारायची.

९. तमाम जनतेकडून याद्वारे सदर ई-लिलावात बोली मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन प्रस्तावासह इअर रक्कम **रु. ३,२३,२००/- (रुपये तीन लाख तेवीस हजार दोनशे मात्र)** ही आरटीजीएस/एनईएफटीने मुंबई येथील प्रमाणपत्र धारक बॅंकेचा **खाते क्र.: ५३३५०१९८०००५००००, बॅंक खात्याचे नाव: युनियन बॅंक ऑफ इंडिया,** ई-लिलाव, **युनियन बॅंक ऑफ इंडिया,** ॲसेट रिकव्हरी ब्रांचे, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र, ४०००२३, **आयएफएससी कोड क्र.: UBIN0553352** येथे जमा करावी. ऑनलाईन प्रस्तावासह टॅन/पॅन कार्ड व पत्त्याच्या पुराव्याच्या साक्षांकित छायाप्रती अपलोड करव्यात. एकापेक्षा जास्त मिळकतीसाठीचे प्रस्ताव वेगवेगळे करावेत. इअर आणि अन्य माहिती/तपशिलांसह ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे **०१.०३.२०२४ रोजी सं. ४.३० पर्यंत.** येथील खालील नमुद स्थावर मिळकतींचे प्रत्यक्ष निरीक्षण मिळकतीच्या ठिकाणी **२६.०२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ४.३०** मध्ये करता येईल.

१०. इच्छुक बोलीदारांना वरील परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेल्या वरील सदर खात्यामध्ये एकदा इअर जमा केल्यावर काढून घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. अयशस्वी बोलीदारांना इअरचा परतावा लिलाव संपल्यानंतर संबंधित बॅंकेद्वारे अशा बोलीदारांनी नमूद केलेल्या खाते क्रमांकावरच करण्यात येईल.

११. पॅन कार्ड, पत्ता पुरावा व ओळख पुरावा, ई-मेल आयडी, मोबाईल क्र. ची प्रत व जर ते स्वत:च्या वतीने किंवा त्यांच्या मुख्यांच्या वतीने बोली लावत असतील तर, नंतरच्या बाबतीत त्यांनी, त्यांची प्राधिकृती जमा केली पाहिजे, कसूर केली तर बोली फेटाळली जाईल. कंपनीच्या बाबतीत कंपनीच्या संचालक मंडळ सदस्यांनी पारित केलेल्या ठरावाची प्रत किंवा कंपनीच्या प्रतिनिधीत्व/मुखत्यारपणाची पुष्टी करणारा अन्य दस्तावेज सादर करून अशा जमा करण्याची पावती/प्रती पोच सदर सेवा पुरवठादार किंवा प्र.धा. बॅंकेकडे ई-मेल किंवा अन्य प्रकारे सदर तारखेपर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्याची हार्ड कॉपी **वसुली अधिकारी -I, डीआरटी-I, मुंबईकडे २० सप्टेंबर, २०२५ रोजीस दु. ४.३० पर्यंत** सादर करावी.

१२. यशस्वी बोलीदारांना इ.अ.र. समायोजित करून त्यांच्या अंतिम बोली रकमेची २५% रक्कम पुढील दिवशी सं. ४.३० पर्यंत वरील परिच्छेद ८ मध्ये नमुद तपशीलानुसार सदर खात्यामध्ये भरावी लागेल.

१३. खरेदीदारांनी अंतिम बोली रकमेची ७५% उर्वरित रक्कम मिळकतीच्या विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी, जर १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस असेल तर १५ व्या दिवसानंतर पहिल्या बॅंकेच्या कार्यालयीन कामाच्या दिवशी वरील परिच्छेद ४ मध्ये दिलेल्या पद्धतीने प्रदान करावी. वरील व्यतिरिक्त, खरेदीदारांना रजिस्ट्रार, डीआरटी-I, मुंबईच्या नावातील डीडीमार्फत रु. १,०००/- च्या रकमेपेक्षा जास्त १% दराने व रु. १,०००/- पर्यंत २% दराने वसुली अधिकारी-I, डीआरटी-I यांच्याकडे पाऊंडेज फी देखील जमा करावी लागेल.

१४. विहित मुदतीत प्रदानात कसूर केल्यास, विक्री खर्च बाजूला केल्यावर जमा रक्कम निम्नस्वाक्षरीकारांना वाटल्यास सरकारकडे जप्त केली जाईल आणि कसूरदार खरेदीदारांना मिळकतीमधील किंवा नंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यातील कोणत्याही हिश्श्यामधील दावे त्यागावे लागतील. विक्रीची नव्याने उद्घोषणा जारी करून मिळकतीची पुनर्विक्री केली जाईल. पुढे खरेदीदाराने अंतिम बोली किंमत आणि त्यानंतर विकली जाईल ती किंमत यामध्ये फरक असल्यास तो भरुन देणे बंधनकारक आहे.

१५. मिळकत **''जसे आहे जेथे आहे तत्त्वाने'' आणि ''जे आहे जसे आहे तत्त्वाने''** विकली जाईल.

१६. विक्रीशी संबंधित कोणतीही कृती करणारे कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे विकावयाच्या मिळकतीसाठी बोली, संपादन किंवा कोणतेही हितसंबंध संपादित करू शकणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टात विहित अटी आणि त्याअंतर्गतचे नियम आणि खालील शर्तींच्या अधीन होईल.

१७. कोणतेही कारण न देता अवास्तव वाटलेल्या सर्व किंवा कोणत्याही बोली स्वीकारणे किंवा फेटाळणे किंवा कोणत्याही समयी लिलाव पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षकारांनी राखून ठेवलेले आहेत.

परिशिष्ट

संच क्र.	मालकाच्या नावांसह मिळकतीचे वर्णन	मिळकतीवरील निर्धारित कर	मिळकत ज्यास बांधील आहे अशा अन्य कोणत्याही भारांचे तपशील	मिळकतीवर करण्यात आलेले कोणतेही दावे आणि त्यांच्या स्वरुप व मूल्याबाबत अन्य कोणतेही ज्ञात तपशील
१.	२.	३.	४.	५.
१.	फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, वैष्णव हाईटस् (नोंदणी क्र. बीओएम/ डब्ल्यूकेडब्ल्यू/एचएसजी (टीजी)/ १३३६२), सर्व्हे क्र. १, हिस्सा क्र. ३, गाव माजिवडा, गणपती कारखान्याजवळ, जय भवानी नगर रोड, ठाणे-४००६०१.	उपलब्ध नाही	माहित नाही	माहित नाही

सदर **१४ ऑगस्ट, २०२५** रोजी मुंबई येथे माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने दिले

शिक्का

सही/-
महेश कुमार
वसुली अधिकारी,
मुंबई, डीआरटी-I

ॲम्फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: १११८, दलमल टॉवर, ११ वा मजला, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०००२१
दूरध्वनी क्र.: +९१ २२ ४९६३ ५४०४ / +९१ २२ ४९६३ ७७०७,
ई-मेल: secretarial@amforgeindustries.com g§Ho$VñWi: www.amforgeindia.in,
सीआयएन: एल२८९१०एमएच१९७१पीएलसी०१५११९

सभासदांना सूचना

ही **सूचना** देण्यात येत आहे की, **ॲम्फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेड** ('कंपनी') (सीआयएन: एल२८९१०एमएच१९७१पीएलसी०१५११९) च्या सदस्यांची त्रेपन्नावी (५३ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **गुरुवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी ०२.३० वा. (भा.प्र.वे)** केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') सुविधा / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमे ('ओएव्हीएम') याद्वारे घेण्यात येईल, ज्यामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेले विषय व्यवहारासाठी ठेवण्यात येतील. ही सभा सामान्य परिपत्रक क्र. ९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर, २०२४ अन्वये तसेच सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल, २०२०, सामान्य परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२०, सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे, २०२० व अन्य परिपत्रक (एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके') तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ ('सेबी') यांचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३ दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ व परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफटी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांक १२ मे, २०२० तसेच त्यासंबंधी इतर परिपत्रक (एकत्रितपणे 'सेबी परिपत्रके') यांच्या अनुषंगाने होईल. ५३ व्या एजीएमची सूचना व वार्षिक अहवाल २०२४-२५ केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे त्या सदस्यांना पाठविण्यात येईल ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा रजिस्ट्रार ॲंड ट्रान्सफर एजंट (आरटीए) किंवा डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत आहेत. एमसीए व सेबी परिपत्रकांनुसार एजीएमच्या सूचनेच्या छापील प्रती पाठविण्याची आवश्यकता रद्द करण्यात आली आहे व ज्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत नाहीत अशा सदस्यांना कंपनी / आरटीए / डिपॉझिटरीजकडून कंपनीच्या संकेतस्थळाचा वेब-लिंक असलेले पत्र पाठविले जाईल, ज्याद्वारे २०२४-२५ चा वार्षिक अहवाल पाहता येईल.

कंपनीचा वार्षिक अहवाल २०२४-२५, ज्यामध्ये सूचना व ५३ व्या एजीएमचे स्पष्टीकरणात्मक विधान समाविष्ट आहे, तो कंपनीच्या संकेतस्थळावर **www.amforgeindia.in** तसेच शेअर बाजाराच्या संकेतस्थळावर, बीएसई लिमिटेड **(www.bseindia.com)** येथे उपलब्ध असेल.

सदस्य ५३ वी एजीएम केवळ व्हीसी सुविधेद्वारे उपस्थित राहून सहभागी होऊ शकतील. सभेला उपस्थित राहण्याच्या सूचना, तपशीलवार, ५३ वी एजीएम बोलावणाऱ्या सूचनेत दिल्या जातील. व्हीसी सुविधेद्वारे ५३ वी एजीएमला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ नुसार कोरम ठरविण्यासाठी केली जाईल.

ई-मेल पत्ते नोंदणी / अद्ययावत करण्याची पद्धत:

- डिमॅट स्वरूपातील शेअर्स असलेले भागधारक त्यांचे ई-मेल, मोबाईल तपशील इ. त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणी/अद्ययावत करू शकतात.
- भौतिक स्वरूपातील शेअर्स असलेले भागधारक त्यांचा ई-मेल पत्ता, बॅंक तपशील, केवायसी तपशील व संपर्क तपशील आवश्यक दस्तऐवजांसह कंपनीकडे प्रत्यक्ष किंवा तिच्या आरटीए, मेसर्स एयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची मेसर्स लिंकइन टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जात असे) यांच्याकडे आवश्यक आयएसआर-१ फॉर्म सादर करून नोंदणी/अद्ययावत करू शकतात. आयएसआर-१ फॉर्म खालील लिंकद्वारे मिळविता येईल: https://web.in.mpms.mufg.com/admin/DownloadFiles/Preffiled-%20LinkšISR1%20Request%20form%20for%20Registering%20Pan,Bank,KYC.pdf

ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत:

- सदस्य ५३ वी एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे किंवा ५३ वी एजीएममध्ये ई-व्होटिंग सुविधेद्वारे, सूचनेत नमूद केलेल्या विषयांवर मतदान करू शकतात.
- रिमोट ई-व्होटिंग / एजीएममधील ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची सविस्तर पद्धत ५३ वी एजीएम बोलावणाऱ्या सूचनेत तपशीलवार दिली जाईल. ही सूचना कंपनीच्या सर्व भागधारकांच्या माहितीसाठी व हितासाठी जारी करण्यात आली आहे, एमसीए व सेबी यांच्या लागू/संबंधित परिपत्रकांनुसार.

ॲम्फोर्ज इंडस्ट्रीज लिमिटेड कडून
सही/-
जयेश विनोदचंद्र ठाक्कर
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी
डीआयएन: ०३४७४९६७

स्थळ : मुंबई
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२५

दी रुबी मिल्स लिमिटेड

RUBY

सीआयएन : एल१७१२०एमएच १९१७पीएलसी०००४४७
नोंद. कार्यालय : रुबी हाऊस, जे. के. सामंत मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८
फोन नंबर +९१-२२-२४३८७८००, फॅक्स क्र. +९१-२२-२४३७८१२५,
ईमेल आयडी : info@rubymills.com, **वेबसाइट :** www.rubymills.com

१०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, ई-व्होटिंग आणि पुस्तक बंद करण्याची सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ ('अधिनियम') च्या कलम ९६ सहवाचता सुधारणेनुसार कंपनीज् (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ ('रुल्स') च्या तरतुदींना अनुसरुन दी रुबी मिल्स लिमिटेड (''कंपनी'') च्या सभासदांना सूचना याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीची १०९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम'') ही एजीएमच्या सूचनेत नमुद केलेले कामकाज करण्यासाठी व्हीसी/ओएव्हीएम मार्फत **मंगळवार, ९ सप्टेंबर, २०२५ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)** घेण्यात येणार आहे.

निगम व्यवहार मंत्रालयाने जनरल सर्क्युलर क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे, २०२० आणि सर्क्युलर क्र. ०२/२०२१ दिनांक १३ जानेवारी २०२१ सहवाचता सर्क्युलर क्र. १४/२०२० आणि १७/२०२० अनुक्रमे दिनांक ०८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२०, जनरल सर्क्युलर क्र. २१/२०२१ दिनांक १४ डिसेंबर, जनरल सर्क्युलर क्र. १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२ आणि जनरल सर्क्युलर क्र. ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३ (एकत्रित 'एमसीए सर्क्यलर' असा उल्लेख) आणि सिक्युरिटीज ॲंड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') ने तिचे सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडीवायसीएमडी१/सीआईआर/पी/२०२०/७९ दिनांक १२ मे, २०२०, सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफ डी/सीएमडी२/सीआयआर/पी/ २०२१/११ दिनांक १५ जानेवरी, २०२१, सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी-२/पी/सीआयआर/ २०२३/४ दिनांक ०५ जानेवरी, २०२३ आणि सेबी/एचओ/सीएफडी/ सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२०/१६७ दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ (एकत्रित 'सेबी सक्युलर्स' असा उल्लेख) द्वारे एकाच ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') किंवा अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'') मार्फत वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') घेण्याची कंपन्यांना परवानगी दिली आहे आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत पाठविण्यापासून सूट प्रदान केली आहे.

कंपनीने कटऑफ डेट म्हणजेच १५ ऑगस्ट, २०२५ रोजीस कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे ईमेल आयडी नोंदविलेल्या भागधारकांना सोमवार, १८ ऑगस्ट, २०२५ रोजी एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत पाठवली आहे. सूचना आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट https://rubymills.com वर आणि एनएसडीएलची वेबसाईट https://www.evoting.nsdl.com वर आणि कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट म्हणजेच https://www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड https://www.nseindia.com येथे उपलब्ध असेल.

प्रत्यक्ष स्वरुपात शेअर्स धारण केलेले आणि ज्यांनी कंपनी/कंपनीच्या आरटीएकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत ते नोंदवु शकतात आणि **info@rubymills.com** येथे कंपनी किंवा आटीए कडे खालील दस्तावेजांच्या स्कॅन्ड प्रती पाठवुन १ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अहवालासह कंपनीच्या १०९ व्या एजीएमची सूचना प्राप्त करु शकतात आणि/किंवा ई-व्होटिंगसह व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे लॉगिन क्रेडेन्शियल प्राप्त करु शकतात.

ए) रीतसर स्वाक्षरी केलेला आणि पूर्ण केलेला फॉर्म आयएसआर-१;
बी) नोंदविण्यासाठी तुमचे नाव, फोलिओ क्रमांक आणि संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक आणि ईमेल पत्ता नमुद करुन सही केलेले विनंती पत्र;
सी) पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन प्रत; आणि
डी) कंपनीकडे नोंदणीकृत सभासदांच्या पत्त्याच्या समर्थनार्थ कोणतेही दस्तऐवज (जसे की आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट) ची स्व-साक्षांकित स्कॅन प्रत.

डिमटेरिअलाइज्ड स्वरुपात शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटस्‌कडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणी/अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येत आहे.

२ सप्टेंबर २०२५ कट-ऑफ तारखेनुसार प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डीमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण केलेले सभासद एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिकली (''रिमोट ई-व्होटिंग'') त्यांचे मतदान करू शकतात.

सर्व सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की :

१. एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाज एजीएममध्ये रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंग प्रणालीद्वारे व्यवहार केला जाऊ शकतो.
२. रिमोट ई-व्होटिंग कालावधी ६ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ९:०० वा. सुरू होईल आणि ८ सप्टेंबर, २०२५ रोजी संध्या. ५:०० वा. संपेल.
३. रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी किंवा एजीएममध्ये ई-व्होटिंग करण्याची पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ तारीख पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ तारीख आहे २ सप्टेंबर, २०२५.
४. कोणीही सभासद ज्यांनी सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि कटऑफ तारीख म्हणजेच १५ ऑगस्ट, २०२५ रोजीस शेअर्स धारण केलेले आहेत ते evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करु शकतात.
५. केवळ तेच सभासद/भागधारक जे एजीएम मध्ये व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे उपस्थित राहतील, त्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावावर आपले मत दिलेले नाही आणि अन्यथा त्यांना असे करण्यापासून प्रतिबंधित केले जाणार नाही, ते एजीएममध्ये मतदान प्रणाली द्वारे ई-मतदान करण्यास पात्र असतील.
६. रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले सदस्य एजीएममध्ये उपस्थित राहण्यास पात्र असतील. तथापि, ते एजीएममध्ये मतदान करण्यास पात्र असणार नाहीत.
७. एजीएम दरम्यान ई-व्होटिंग आणि रिमोट ई-व्होटिंगसाठी तपशीलवार प्रक्रिया आणि माहिती एजीएमच्या एजीएमच्या सूचनेत दिलेली आहे.
८. सभासदांनी नोंद घ्यावी की :
   - रिमोट ई-व्होटिंग बंद होण्याची तारीख आणि वेळेनंतर एनएसडीएलद्वारे निष्क्रिय करण्यात येईल.
   - एजीएममध्ये मतदान करण्याची सुविधा एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून दिली जाईल.
   - ज्या व्यक्तींची नावे कटऑफ तारखेस डिपॉझिटरीजकडे असलेले लाभकारी मालकांचे रजिस्टर किंवा सभासद रजिस्टर मध्ये नोंदविलेली असतील तेच फक्ता रिमोट ' ई-व्होटिंग तसेच एजीएममध्ये ई-व्होटिंगची सुविधा घेण्यासाठी हक्कदार राहतील.
   - वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना कंपनीची वेबसाइट https://rubymills.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ची वेबसाइट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध करून देण्यात आली आहे.
९. एजीएमच्या आधी आणि दरम्यान इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान किंवा तांत्रिक सहाय्याशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रार असल्यास, सभासद भागधारकांसाठी असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यूज) चा संदर्भ घेऊ शकतात आणि भागधारकांसाठी ई-व्होटिंग मॅन्युअल www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड सेक्शन मध्ये उपलब्ध आहे किंवा खालीलप्रमाणे कंपनीशी संपर्क साधा:

एनएसडीएल संपर्क : **ईमेल आयडी :** evoting@nsdl.co.in **दूरध्वनी क्र.:** १८०० १०२० ९९०/ ०२२-२४९९७०००/०२२-४८८६७०००	**कंपनी सचिव :** अनुराधा तेंडुलकर

दी रुबी मिल्स लिमिटेड
सही/-
भरत शाह
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०००७१२४८

दिनांक : १९ ऑगस्ट २०२५
ठिकाण : मुंबई